


दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १५३ •मंगळवार, दि. ०२ सप्टेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये
• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

## थोडक्यात...

### भारत-चीन-रशियाची नवी आघाडी, जिनपिंग अन् पुतीन यांच्यासोबत नवे समीकरण

नवी दिल्ली : शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग एकत्र आले. या भेटीने अमेरिकेच्या राजकीय समीकरणांमध्ये खळबळ उडवली आहे. तिआनजिन येथे झालेल्या या शिखर परिषदेतून भारताला महत्वपूर्ण यश मिळालं असून पंतप्रधान मोदींचा हा दौरा राजनैतिक दृष्ट्या अत्यंत यशस्वी ठरला आहे. अमेरिकेने भारतावर ५० टक्के टॅरिफ लादल्याच्या पार्श्वभूमीवर मोदींचा चीन दौरा झाला. अशा परिस्थितीत पुतिन आणि जिनपिंगसोबत मोदींच्या एकत्रित उपस्थितीने नव्या धुरीची स्पष्ट छटा दिसून आली. या तिघांच्या सामूहिक भेटीचे संदेश थेट वॉशिंग्टनपर्यंत पोहोचले असल्याचे आंतरराष्ट्रीय विश्लेषकांचे म्हणणे आहे.

### लालबागचा राजाच्या तखझ दर्शनामुळे सर्वसामान्य भक्तांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झालं का?

मुंबई : लालबागचा राजा गणेशोत्सव पंडालातील व्हीआयपी आणि सामान्य दर्शन या वेगळ्या व्यवस्थेविरोधात दाखल केलेल्या तक्रारीची राज्य मानवाधिकार आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणी राज्य सरकार तसेच संबंधितांनी लेखी उत्तर सादर करावं असे निर्देश मानवाधिकार आयोगाने दिले आहेत. ॲड. आशिष राय आणि ॲड. पंकज मिश्रा यांनी दाखल केलेल्या तक्रारीवर सुनावणी करताना आयोगाने या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकार, मुंबई पोलीस आयुक्त, लालबाग मंडळ सचिव, मंत्रालय तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांना नोटीस बजावली आहे. आयोगाने सर्व संबंधितांना लवकरात लवकर लेखी उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

### मालेगावात ढगफुटी सदृश्य पावसाचं थैमान! आश्वासन पोहोचलं प्रत्यक्ष मदत कधी?

मालेगाव : राज्याच्या बहुतांश भागांमध्ये पावसाचा जोर कमीजास्त प्रमाणात दिसत असतानाच उत्तर महाराष्ट्रातील मालेगाव तालुक्यात असणाऱ्या माळामाथा परिसरात ढगफुटी सदृश्य पावसाने हाहाकार माजवला. अचानक झालेल्या या अतिप्रचंड पावसामुळं कांदा, कपाशी, मका या पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं असून, मध्यरात्री आलेल्या पावसाने कंधाने, झोडगे, चिखल ओहोळ, शेंदुर्णी, साजवळ या गावांमध्ये मोठं नुकसान केल्याचं पाहायला मिळालं. दरम्यान, साजवळ इथं याच पावसादरम्यान वीज पडून एक म्हैस ठार झाली तर अनेक ठिकाणी शेत शिवारात पाणी साचल्याची घटना घडली. एकीकडे ढगफुटी सदृश्य पाऊस आणि दुसरीकडे पावसाची प्रतीक्षा असंच काही चित्र नाशिकच्या ग्रामीण भागांमध्ये पाहायला मिळत आहे. सदर घटनेनंतर महसूल अधिकाऱ्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करत मदत करण्याचं आश्वासन दिलं.

# हायकोर्टाच्या निर्देशांवर जरांगे पाटलांचे भाष्य; म्हणाले, "मेलो तरी चालेल, पण..."

मुंबई । प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मुंबईत आंदोलन करत आहेत. दरम्यान आज त्यांच्या आंदोलनाचा चौथा दिवस आहे. दरम्यान त्यांच्या आंदोलनाविरुद्ध हायकोर्टात अनेक याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. त्यावर आज सुनावणी पार पडली. यानंतर हायकोर्टाने राज्य सरकारला महत्वाचे निर्देश दिले आहेत. तसे आंदोलकांना देखील सुनावले आहे. यावर आता मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे.



**• मुख्यमंत्री फडणवीस यांची प्रतिक्रिया काय?**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज पुणे दौऱ्यावर होते. त्यांच्या हस्ते आज बहूचर्चित उड्डाणपुलाचे लोकार्पण करण्यात आले. यामुळे आता सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडीचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. दरम्यान एवेळी हायकोर्टात पार पडलेल्या सुनावणीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.**

हायकोर्टात सुनावणी झालयावर कोर्टाने महत्वाचे निर्देश दिले आहेत. त्यावर बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले, कोर्टाच्या निर्णयाचे आपल्याला पालन करायचे आहे. सर्व आंदोलकांनी शांत बसावे. आरक्षण घेतल्याशिवाय मी उठणार नाही. सरकारच्या बैठकांबाबत मी फक्त माध्यमांमधून ऐकत आहे.

पुढे बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले, आंदोलकांनी आपली वाहने मुंबईतील पार्किंगमध्ये लावावीत, मी मेलो तरी चालेल, पण मी आरक्षण घेणारच. आम्ही भुजबळ यांना जास्त महत्व देत नाही. मराठा आणि कुणबी एकच आहेत हे फायनल आहे. मी तुमच्या लेकरांसाठी लढा देतोय. ज्यांना माझ ऐकायच नाही त्यांनी गावी निघून जावे. सरकारच्या लोकांनी इथे चर्चेला यावे. तुमच्याशी बोलण्यासाठी मला पाणी प्यावे लागले. मुंबईकरांना त्रास होईल असे कोणी वागू नका. हेच आंदोलक अंतरवालीत देखील होते, पण या ठिकाणी षडयंत्र दिसून येत आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## कितीही शिव्या दिल्या तरी बाबासाहेबांच्या संविधानाच्या बाहेर जाणार नाही, फडणवीसांनी जरांगेंना ठणकावून सांगितलं

मुंबई । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून गेल्या काही दिवसांपासून राज्यात तणावाचे वातावरण आहे. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाचा चौथा दिवस सुरू केला आहे.

त्यांनी ओबीसी कोट्यातून मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी लावून धरली आहे. याच पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जरांगे यांच्या मागणीवर आणि त्यांच्या टीकेवर स्पष्ट शब्दांत उत्तर दिले आहे. कितीही शिव्या दिल्या, उपहास केला तरी मी बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाच्या आणि कायद्याच्या बाहेर जाणार नाही, असे फडणवीस यांनी ठणकावून सांगितले.




मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या आंदोलनादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सातत्याने टीका केली आहे. त्यांच्या या टीकेला उत्तर देताना फडणवीस म्हणाले, मला शिव्या खाण्याची आणि उपहास सहन करण्याची सवय आहे. लोक कर्तृत्वामुळे इतिहासात लक्षात राहतात, शिव्या देणाऱ्यांना कोणी लक्षात ठेवत नाही. फडणवीसांनी पुढे सांगितले की, जरांगे यांच्या मागण्यांकडे सरकार सकारात्मक दृष्टिकोनातून पाहत आहे. मात्र, कोणताही निर्णय हा कायद्याच्या चौकटीत आणि संविधानाच्या मर्यादितच घेतला जाईल. जे समाजाच्या हिताचे आहे, तेच आम्ही करू. पण सरसकट ओबीसी कोट्यात आरक्षण देण्याची मागणी सामाजिक ऐक्य बिघडवू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

मराठा आरक्षणाचा मुद्दा हा केवळ राजकीय नाही, तर सामाजिक आणि कायदेशीरदृष्ट्याही गुंतागुंतीचा आहे. फडणवीस यांनी यावर भाष्य करताना सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी मराठा

▶▶ उर्वरित पान २ वर



*भावपूर्णश्रद्धांजली... मुंबई येथे सुरू असलेल्या आंदोलनात उपोषणकर्त्यांची होत असलेली अवहेलना सहन न झाल्याने कै. नितीन माणिक चव्हाण यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली, ही घटना अत्यंत वेदनादायक आणि मन हेलावून टाकणारी आहे. आज सुगाव (ता. अंबाजोगाई) येथे त्यांच्या घरी जाऊन सांत्वनपर भेट दिली. या दुर्दैवी प्रसंगी त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याचे सामर्थ्य लाभो, हीच प्रार्थना.- खासदार बजरंग सोनवणे*

## सेल्फी घेणं अंगलट; बाप, लेक बिंदुसरा तलावात पडले

**डॉ. मुजाहिद मोमीन मदतीला धावल्याने दोघेही सुखरूप**

बीड । प्रतिनिधी

बिंदुसरा प्रकल्पावर एक कुटुंब गेले होते. यावेळी सेल्फी घेताना १२ वषारची मुलगी तलावात पडली, तिला वाचविण्यासाठी पालकाने उडी घेतली पण त्यांनाही पोहता येत नव्हते, लेक आणि बाप बुडत

▶▶ उर्वरित पान २ वर

**डॉ. मुजाहिद मोमीन यांनी पाण्यातून बुडत असलेल्या बाप आणि लेकीला सुरक्षित बाहेर काढताच, त्यांच्या सोबत सेल्फी घेण्यासारखे अनेकजण पुढे आले. यावेळी त्यांनी सर्वांना पोहता यायला हवे, ज्यांना पोहता येत नसेल त्यांनी शिकायला हवे, अशा संकटकाळी कोणाचीही मदत करावी असे सांगत सूल्फी न घेण्याचे सांगत बिंदुसरा प्रकल्पावर पर्यटनासाठी येणाऱ्यांनी सेल्फीचा मोह टाळावा असे आवाहन केले.**



## कपिलधारवाडी येथून आंदोलकांसाठी चटणी-भाकरी मुंबईला रवाना

बीड । प्रतिनिधी

मुंबईतील आझाद मैदानावर मराठा आरक्षण चळवळीतील संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील उपोषणाला बसले असून त्यांना साथ देण्यासाठी राज्यभरातील मराठा बांधव मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. सरकारने आझाद मैदान परिसरातील हॉटेल बंद ठेवले



असल्याने आंदोलनकर्त्यांच्या जेवण-पाण्याची मोठी गैरसोय निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथील. गावकऱ्यांनी आंदोलकांसाठी शिदोरीची मोठी व्यवस्था केली. आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभर ठिकठिकाणी सुरू

▶▶ उर्वरित पान २ वर

## मराठा हे कुणबीच ! विश्वास पाटील यांनी मराठवाड्यातील नोंदी पुढे आणल्या

**• ब्रिटिशकालीन रेकॉर्डमधून धक्कादायक खुलासा**

पुणे । प्रतिनिधी

मराठवाडा आणि महाराष्ट्रातील मराठा समाजाच्या मागासवर्गीय आरक्षणासाठीचा लढा सध्या तीव्र होत असताना,



याच पार्श्वभूमीवर लेखक आणि भारतीय प्रशासकीय सेवेत निवृत्त अधिकारी विश्वास पाटील यांनी ब्रिटिशकालीन आकडेवारीचा ठोस आधार समोर ठेवला आहे. ब्रिटिश सरकारने १८७० ते १९१० या काळात शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेली जाती-धर्मांची जनगणना आजही पुरावा म्हणून ग्राह्य धरली पाहिजे, असा त्यांचा ठाम दावा आहे.

**• ब्रिटिशकालीन जनगणनेतील आकडेवारी**

विश्वास पाटील यांनी सांगितले की, १८८१ मध्ये ब्रिटिशांनी सर्व धर्म, जाती, उपजाती, भटके, विमुक्त यांची जनगणना केली. पुणे जिल्ह्यातील जनगणना तर महात्मा फुले यांच्या देखरेखीखाली पार

▶▶ उर्वरित पान २ वर

## जिल्हा कचेरी समोरील बेमुदत धरणे आंदोलनकारी जयसिंग वीर प्रकृती बिघडली; उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल

बीड । प्रतिनिधी

करचुंडी येथील गायरान, हक्काचा सातबारा व विविध मागण्या साठी जिल्हा कचेरी समोर गेल्या पंधरा दिवसापासून गावकऱ्यांसह आंदोलनाचे नेतृत्व करणारे जयसिंग वीर यांची प्रकृती खालावली आहे. गायरान धारकांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी अनेक दिवसापासून आंदोलन करत आहेत.१५ व्या दिवशी त्यांची प्रकृती बिघडल्याने पोलीस



प्रशासनाने म्बुलन्स बोलवून त्यांना बीड जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. त्यांच्यावर सध्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांनी

▶▶ उर्वरित पान २ वर

## आधी संपलेला पक्ष म्हणून हिणवलं, आता मोठं आंदोलन उभं राहिल्यावर 300 खासदार असूनही शरद पवारच केंद्रबिंदू'; सुप्रिया सुळेंची टीका




मुंबई । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी आझाद मैदानावर आंदोलन सुरू केले आहे. राज्यभरातून हजारो आंदोलक मुंबईत आले आहेत. या आंदोलनाला राजकीय नेत्यांनीही पाठिंबा दिला आहे. काल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. यावेळी आंदोलकांनी गोंधळ केला. शरद पवार यांच्याविरोधात सुळे यांच्यासमोरच घोषणाबाजी सुरू केली. यामुळे काही काळ गोंधळ सुरू होता. दरम्यान, यावरुन राजकीय वर्तुळात

▶▶ उर्वरित पान २ वर



# इतिहास, भूगोल आणि प्रेरणादायी वारसा : किल्ले शिवनेरी

सह्याद्रीच्या हिरव्यागार कुशीत वसलेला शिवनेरी किल्ला केवळ एक किल्ला नाही, तर महाराष्ट्राच्या इतिहासातील अद्वितीय स्मृतीचिन्ह आहे. जुन्नर शहराच्या उत्तरेला उभा असलेला हा गड जणू त्या भूमीचा रक्षक बनून शतकानुशतके उभा आहे. इथे प्रत्येक दगड, प्रत्येक कडा, प्रत्येक तट इतिहासाची गाथा सांगतो.

इ.स. सहाव्या शतकापासून अस्तित्वात असलेला शिवनेरी किल्ला महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महत्त्वाचा साक्षीदार आहे. सुरुवातीला हा किल्ला एक महत्त्वाचा लष्करी ठाणे म्हणून उभारण्यात आला होता. अनेक राजवटींनी या किल्ल्यावर आपले वर्चस्व गाजवले. मात्र, भोसले घराण्याच्या काळात याला खऱ्या अर्थाने ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले.

१५९५ मध्ये मालोजीराजे भोसले यांच्या ताब्यात हा गड आला. याच ठिकाणी, १९ फेब्रुवारी १६३० रोजी, छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला. या किल्ल्याच्या साक्षीने त्यांचे बालपण घडले. ज्या किल्ल्यावर एका युगपुरुषाने पहिला श्वास घेतला, तो किल्ला स्वाभाविकच असामान्य तेज आणि पावित्र्य लाभलेला ठरतो. बालवयातच त्यांनी राज्यकारभार, युद्धकला आणि मुत्सद्देगिरीचे धडे येथेच गिरवले.

शिवनेरीचा निसर्गसंपन्न परिसर, मजबूत तटबंदी आणि सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून केलेली रचना पाहिल्यास शहाजी राजांनी हा किल्ला निवडण्यामागचे महत्त्व लक्षात येते. शिवनेरीवर झालेल्या संस्कारांमुळेच शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेची प्रेरणा मिळाली. शिवनेरीचे महत्त्व केवळ त्याच्या संरक्षणात्मक रचनेत नाही तर त्याच्या सामरिक स्थानातही दडलेले आहे. नाणेघाट आणि माळशेज घाट या प्राचीन व्यापारी मार्गांवर नजर ठेवणाऱ्या या किल्ल्यामुळे येथील सत्ताधाऱ्यांना व्यापारावर नियंत्रण ठेवणे सहज शक्य होत असे. सातवाहनांच्या काळापासून



या घाटखिंडी पश्चिम किनाऱ्यावरील समृद्ध बंदरांना देशाच्या आतील प्रदेशाशी जोडत होत्या. त्यामुळे या परिसरावर नियंत्रण म्हणजे व्यापार, सत्ता आणि सामरिक बळ या तिन्ही गोष्टींवर पकड मिळविणे होय. म्हणूनच, पुढे कुठलाही राजवंश आला तरी शिवनेरीवर नियंत्रण मिळवणे हे त्यांच्यासाठी अनिवार्यच होते.

शिवनेरीची रचना ही युद्धकौशल्याचे अद्वितीय उदाहरण आहे. डोंगरकड्यांचे नैसर्गिक बळ आणि त्याला जोडलेली भक्कम चिरेबंदी, तटबंदी यामुळे हा किल्ला जवळपास अभेद्यच मानला जात असे. साधारणपणे साडेतीन हजार फूट उंचीवर वसलेल्या या किल्ल्यापर्यंत पोहोचण्यासाठी सात दरवाज्यांतून जावे लागते. हे दरवाजे वळणदार व गुंतागुंतीच्या पद्धतीने बांधलेले असल्यामुळे शत्रू गोंधळून जाई, त्याचा वेग मंदावला जाई आणि मग गडावरून हल्ला चढविणे सोपे होई.

किल्ल्याच्या माथ्यावर पोहोचल्यानंतर एक विस्तीर्ण पठार दिसते. त्यात निवासासाठी घरे, धान्यसाठ्याची कोठारे, तसेच प्रस्तरात खोदलेली पाण्याची मोठी टाकी आहेत. उन्हाळ्यातील उष्णतेत किंवा शत्रूच्या दीर्घकाळ चालणाऱ्या वेढ्यातही या पाणीसाठ्यामुळे गडाची स्वायत्तता टिकून राहायची. किल्ल्याच्या उत्तरेला 'कडेलोट' नावाचा उग्र कडा आहे, जिथून शत्रूंना खाली फेकले जात असे.

किल्ल्याच्या आत शिवाई देवीचे मंदिर आहे. शिवनेरी हा केवळ सैन्यदृष्ट्या महत्त्वाचा गड नाही, तर धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्याही पूज्य मानला जातो.

आजही शिवनेरी महाराष्ट्राच्या लोकमानसात अपार आदराचे स्थान राखतो. दरवर्षी १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती येथे मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. हजारो शिवभक्त, शाळकरी मुले, इतिहासप्रेमी व पर्यटक या दिवशी गडावर एकत्र येतात. शिवनेरीचा गगनभेदी निनाद त्यांना धैर्य, शौर्य आणि स्वराज्याच्या विचारांनी प्रेरित करतो.

शिवनेरी किल्ल्याचा प्रवास केवळ ऐतिहासिक सफर नसून, त्याच्या आसपासच्या परिसरात अनेक अद्भुत ठिकाणे आहेत. इथे इतिहास, अध्यात्म आणि निसर्गसौंदर्य यांचा अनोखा संगम पाहायला मिळतो. किल्ल्यापासून अवघ्या पाच किलोमीटरवर लेण्याद्री लेण्या आहेत. या प्राचीन बौद्ध लेण्या उत्कृष्ट शिल्पकलेचे दर्शन घडवतात. याच गुंफांमध्ये असलेले गिरीजात्मज मंदिर अष्टविनायकांपैकी एक असून, गणेशभक्तांसाठी हे पवित्र स्थळ आहे. गुंफांपर्यंतच्या चढाई दरम्यान दिसणारे विस्तीर्ण निसर्गदृश्य मन मोहून टाकते.

शिवनेरीपासून दहा किलोमीटरवर असलेली ओझर आणि गिरीजात्मज गणपती मंदिरे भक्तांसाठी विशेष आकर्षण आहेत. विघ्नहर गणेशाला समर्पित असलेले ओझर मंदिर देखण्या वास्तू कलेसाठी प्रसिद्ध आहे. इथली शांत आणि भक्तिमय वातावरण प्रार्थनेसाठी पोषक आहे. निसर्ग प्रेमींसाठी माळशेज घाट हे रमणीय स्थळ शिवनेरीपासून तीस किलोमीटरवर आहे. धुक्याने वेढलेले डोंगर, वाहणारे धबधबे आणि जैव विविधतेने नटलेला परिसर इथे पाहायला मिळतो. पावसाळ्यात तर हा संपूर्ण प्रदेश हिरव्यागार शालूत नटतो. साहस प्रेमींनी नाणेघाटाला भेट द्यायलाच हवी. हा प्राचीन व्यापारी मार्ग आणि ट्रेकिंगचे प्रसिद्ध ठिकाण पस्तीस किलोमीटरवर आहे. इथल्या कोरीव शिला लेखांमधून शतकांपूर्वीच्या व्यापाऱ्यांच्या आठवणी जपल्या गेल्या आहेत. नाणेघाटातून सह्याद्री पर्वतरांगांचे विस्मयकारक दृश्य दिसते. केवळ सहा किलोमीटरवर जुन्नर लेण्या आहेत. दोन हजार वर्षांपूर्वी कोरलेल्या या बौद्ध लेण्यांमध्ये चैत्यगृह आणि विहारांचा समावेश आहे. कोरीव नक्षीकाम, प्राचीन काळातील भिक्षूंचे वास्तव्य आणि शिल्पकला यामुळे हे ठिकाण विशेष आहे. इतिहास, अध्यात्म आणि निसर्ग यांचा सुंदर मिलाफ असलेल्या शिवनेरी आणि त्याच्या आजूबाजूच्या ठिकाणांना भेट देण्याचा अनुभव अविस्मरणीय ठरतो.

युनेस्कोच्या जागतिक वारसा मानांकन यादीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा समावेश करण्यात आला असून, शिवनेरीलाही त्या सन्माननीय श्रेणीमध्ये स्थान मिळाले आहे. त्यामुळे शिवनेरीला जागतिक स्तरावरही ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा म्हणून विशेष ओळख प्राप्त झाली आहे.

खरे तर, शिवनेरी हा केवळ दगड आणि मातीचा किल्ला नाही तर तो आहे धैर्याचा स्रोत, चारित्र्याचा आधार आणि महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक. शिवनेरी किल्ला हा केवळ ऐतिहासिक वारसा नसून महाराष्ट्राच्या अभिमान, शौर्य आणि परंपरेचे प्रतीक आहे. इतिहासप्रेमी, ट्रेकिंगसाठी उत्सुक किंवा संस्कृतीचा अभ्यास करणारे पर्यटक इथे एक अद्वितीय अनुभव घेऊ शकतात. किल्ल्याच्या भव्यतेचा अनुभव घेत असताना, त्या महान युगाचा साक्षीदार होण्याची संधी लाभते, ज्या काळाने भारताच्या भवितव्याला आकार दिला. इथल्या सुळक्यांवर उभे राहून सह्याद्रीच्या विस्तीर्ण रांगांचे सौंदर्य डोळ्यांत साठवता येते. शिवनेरीचा प्रत्येक दगड, प्रत्येक तटबंदी आणि प्रत्येक वाट इतिहासाचे सोनेरी पान उलगडते.

**–संजय डी.ओरके, विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**मंत्रालय, मुंबई**

◆ पान ४ वरून पुढे...

## माजलगाव धरणातून...

होते तर त्यानंतर शनिवारी आणखीन ६ असे ९ दरवाजे उघडून त्यातून १८ हजार क्युसेसने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. धरण कार्यक्षेत्रातून येणाऱ्या पाण्याची आवक पाहून विसर्ग कमी अथवा जास्त करण्यात येणार आहे.त्यामुळे प्रशासनाने माजलगाव,मनूर,लुखेगाव,गोविंदपूर, सांडस चिंचोली,देपेगाव,नागडगाव, रोशनपुरी या नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.दरम्यान, मागील काही दिवसांत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेत पिकांचे झालेल्या नुकसानीची शनिवारी तहसीलदार संतोष रुईकर,तालुका कृषी अधिकारी यांनी शेत पिकांच्या बांधावर जाऊन झालेल्या नुकसानीची माहिती घेऊन पंचनामे करणार आहेत.ग्राम सेवक,तलाठी,कृषी सहायक यांची त्रिसदस्य समिती स्थापन करण्यात आली असून,ही समिती नुकसानीचे पंचनामे करणार आहे

## लिंबागणेश येथे...

अधिकारी महादेव जायभाये, तलाठी गणपत पोतदार यांच्या मार्फत जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक बीड यांना देण्यात आले. यावेळी मळकुवाडीचे सरपंच रामकिसन कदम, धनगर समाजाचे नेते कृष्णा पितळे आदींची भाषणे झाली.आंदोलनामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती.मात्र यावेळी रूग्णवाहिकेला मोकळी वाट करून देण्यात आली. यावेळी आंदोलनात लिंबागणेश पंचक्रोशीतील सकळ मराठा समाजा बरोबरच गावगाड्यातील बहुजण समाजातील बांधवांनी आंदोलनाला पाठिंबा दिला. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, पिंपरनईचे सरपंच बाळासाहेब वायभट, पोखरीघाटचे सरपंच बाबासाहेब मुळीक, अंजनवतीचे सरपंच सुनिल येडे, मेंगडेवाडीचे ज्ञानेश्वर मेंगडे, प्रशांत कदम,

◆ पान ४ वरून पुढे...

राजेभाऊ गिरे, कल्याण वाणी, औदुंबर नाईकवाडे, सुंदरराव जाधव, पांडुरंग वाणी, गणपत तागड, समीर शेख, अशोक वाणी, अक्षय येडे ,संजय घोलप, अजय थोरात, आदी सहभागी होते. सरकारने न्यायालयाचा हवाला देत मराठा समाजाला सरसकट ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देता येणार नाही असे स्पष्ट केले आहे. यावर तोडगा म्हणून जरांगे पाटलांनी सरसकट हा शब्द वगळत, ५८ लाख कुणबी नोंदींच्या आधारे मराठा व कुणबी एकच असल्याने तातडीने अध्यादेश काढावा, असा पर्याय दिला आहे. सरकारकडे आता कोणतेही कारण शिल्लक नाही. गरजवंत मराठ्यांच्या सहनशक्तीचा अंत पाहू नये, तातडीने आरक्षणाचा प्रश्न निकाली काढावा, अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली. मुंबईतील आझाद मैदानावर जरांगे पाटलांच्या समर्थनार्थ जमलेल्या कार्यकर्त्यांसाठी हॉटेल व दुकाने बंद ठेवून अन्नपुरवठा बंद करण्याचा प्रयत्न सरकारकडून करण्यात आला. हा अमानवीय व संवेदनाहीन प्रयत्न असल्याचे सांगून सर्वांनी याचा तीव्र निषेध केला. मुंबईतील बांधवांना सर्वोतोपरी मदत पाठवली जाईल, असा निर्धार आंदोलनकर्त्यांनी केला.

## हुतात्मा स्मारकाची...

कार्यकारी अधिकारी जितीन रहमान , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , तहसीलदार चंद्रकांत शेळके , नगरपरिषद मुख्याधिकारी शैलेश फडसे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता चंद्रकांत बोराडे यांनी स्थळाला भेट देऊन आवश्यक कामांची तपासणी केली . यावेळी स्मारक परिसरातील स्वच्छता , रंगरंगोटी आणि व्यवस्थापन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली . नगरपरिषदेचे नगर अभियंता किरण देशमुख , मंडळ अधिकारी सचिन सानप , ग्राम महसूल अधिकारी शब्बीर शेख , स्वच्छता विभाग प्रमुख भागवत जाधव आणि स्वच्छता

◆ पान ४ वरून पुढे...

निरीक्षक आयुब शेख आदी अधिकारीही या पाहणीवेळी उपस्थित होते. प्रशासनाने स्मारक परिसर स्वच्छ , आकर्षक आणि सुव्यवस्थित ठेवण्याच्या सूचना दिल्या असून नागरिकांच्या सहभागातून हुतात्म्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी तयारी करण्यात येत आहे . १७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या कार्यक्रमासाठी सर्व यंत्रणा सज्ज राहणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले .

## परळी रेल्वे...

विश्रांती घ्यायचा निर्णय घेतला. ती मुलीला कुशीत घेऊन झोपली असताना तिच्या पतीने स्थानक परिसरात थोडा वेळ फिरून येण्याचे ठरवले. त्याच वेळी बालिका आईजवळून थोडी दूर जाऊन खेळत होती. दरम्यान, एकटी बालिका पाहून अज्ञात नराधमाने तिला उचलून नेले आणि निर्जन भागात नेऊन तिच्यावर अमानुष अत्याचार केला. ही अमानुष घटना ४ वाजताच्या सुमारास घडली. काही वेळाने मुलगी रडत आईकडे परत आली. आईने मुलीला शांत करण्याचा प्रयत्न केला असता तिच्या गुप्तांगातून रे स्त्राव होत असल्याचे दिसून आले. यानंतर संपूर्ण प्रकार उघडकीस आला. पीडित बालिकेला तातडीने परळी उपजिल्हा रुग्णालयात तपासणीसाठी आणण्यात आले होते. मात्र पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात हलविण्यात आले आहे. सध्या तिच्यावर उपचार सुरू आहेत.या प्रकरणात आरोपी अद्याप अज्ञात असून घटनेचे गांभीर्य लक्षात घेत सहा. पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांनी तपास हाती घेतला असून पोलिसांचे पथक नराधम आरोपीचा कसून शोध घेत आहे.

## गणेशोत्सव निमित्त...

या पथसंचलनात पोलीस उपनिरीक्षक अप्पासाहेब रोकडे, पद्माकर

◆ पान ४ वरून पुढे...

आहेर, सपो. लक्ष्मण बीडकर, बाबासाहेब राख, गोविंद बडे, पोह. विशाल क्षीरसागर, अविनाश घुंगरट, सतिश राऊत, खाडे, बाळासाहेब ढाकणे, खाडे यांच्यासह एकूण ३० पोलीस कर्मचारी व ३० होमगार्ड सहभागी झाले होते. गणेशोत्सव काळात मूर्ती प्रतिष्ठापनेपासून ते गणेश विसर्जनापर्यंत कडकडीत बंदोबस्त ठेवण्यात येणार असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले.

## चौकात वाढदिवसाचा...

नागरिकांनी अशा व्यक्तींचे माहिती ११२ नंबरवर किंवा थेट मला फोन करून द्यावेत, असे त्यांनी सांगितले. तसेच माहिती देणाऱ्यांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.ज्यांनी चौकात वाढदिवस साजरे केले त्यांना पकडून थेट न्यायालयात हजर करण्यात येईल. त्यामुळे त्यांना याचा चाप बसेल, असा इशारा पोलीस पोलीस निरीक्षक बल्लाळ यांनी दिला. हॉलमध्ये किंवा घरीच साजरे करा वाढदिवस– वाढदिवस साजरा करणे चुकीचे नाही, मात्र सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालणे असभ्य आणि कायद्याच्या विरोधात आहे. जर साजरा करायचाच असेल तर तो एखाद्या हॉलमध्ये किंवा घरात करावा, जेणेकरून सामान्य नागरिकांना त्रास होणार नाही, असे पोलीस निरीक्षक बल्लाळ यांनी स्पष्ट केले.

## येवलवाडी येथे...

सामाजिक संदेश देणाऱ्या रांगोळ्यांद्वारे आपली कला सादर केली. सामाजिक उपक्रमांमुळे गणेशोत्सव अधिक उपयुक्त ठरला असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. फक्त सांस्कृतिक कार्यक्रमांपुरता उत्सव न ठेवता समाजहिताचा संदेश देण्याचे कार्य जय भगवान गणेश मंडळाने गणेशोत्सवातून समाजसेवेचा नवा आदर्श निर्माण केला आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

## हायकोर्टाच्या निर्देशांवर...

मराठा आंदोलनाबाबत हायकोर्टाचे स्पष्ट निर्देश; फडणवीस म्हणाले, ज्या गोष्टी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी आज प्रवासात असल्याने कोर्टाने काय म्हटले हे मी नीट ऐकले नाही. परवानगी होती ती काही अटीशर्तीसह होती. त्या परवानगीचे उल्लंघन झालेले आहेत. रस्त्यावर ज्या गोष्टी चाललेल्या आहेत, त्यासंदर्भात कोर्टाने प्रचंड नाराजी व्यक्त केलेली आहे. याबाबत कोर्टाने काही निर्देश दिले आहेत. कोर्टाच्या निर्देशांचे पालन प्रशासनाला करावे लागते.

## कितीही शिव्या...

आरक्षणासंदर्भात काही निर्णय दिले आहेत, ज्यांचा अवमान करता येणार नाही. कायद्याच्या बाहेर जाऊन निर्णय घेतले तर ते एकही दिवस टिकणार नाहीत. यामुळे मराठा समाजाची फसवणूक होण्याची शक्यता आहे, असे फडणवीस यांनी नमूद केले. त्यांनी पुढे सांगितले की, सरकारने यासंदर्भात विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती स्थापन केली आहे, जी या विषयावर सविस्तर चर्चा करत आहे. फडणवीस यांनी सामाजिक ऐक्यावर विशेष भर दिला. सरसकट ओबीसी कोट्यात आरक्षण देण्याची त्यांची मागणी म्हणजे सामाजिक तणाव वाढण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत सर्व समाजघटकांचे हित जपणे महत्त्वाचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. सरकार कोणत्याही समाजाला अन्याय होऊ देणार नाही, अशी ग्वाही देताना त्यांनी संविधान आणि कायद्याच्या चौकटीतच सर्व मागण्यांचा विचार केला जाईल, असे आश्वासन दिले.

जरांगेंच्या उपोषणाचा चौथा दिवस– मनोज जरांगे पाटील यांचे आझाद मैदानावरील उपोषण चौथ्या दिवशीही सुरू आहे. त्यांनी मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण मिळावे, यासाठी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांच्या समर्थकांनीही मोठ्या संख्येने आझाद मैदानावर उपस्थिती लावली आहे. मात्र, फडणवीस यांच्या स्पष्टोक्तीनंतर या आंदोलनाची पुढील दिशा काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मराठा आरक्षणाचा प्रश्न हा राज्यातील राजकारण आणि समाजकारणाचा कळीचा मुद्दा बनला आहे. फडणवीस यांनी संयम आणि संविधाननिष्ठ भूमिका दाखवली असली, तरी जरांगे यांचे आंदोलन आणि त्यांच्या मागण्यांवर सरकार कसा तोडगा काढणार, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष आहे. उपसमितीच्या चर्चेतून आणि कायदेशीर प्रक्रियेतून यावर लवकरच मार्ग निघेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

## सेल्फी घेणं...

असल्याने कुटुंबाने आरडाओरडा केली. यावेळी डॉ. मुजाहिद मोमीन यांनी कसलाही विचार न करता तलावात उडी घेऊन दोघाही बाप, लेकीला सुरक्षित बाहेर काढले. यामुळे त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पण येथे सेल्फी काढणे या कुटुंबाच्या चांगलेच अंगलट येणार होते. यामुळे येथे जाणाऱ्यांनी सेल्फीचा मोह टाळावा अशी अपेक्षा व्ये केली जात आहे. जोरदार झालेल्या अवकाळी पावसामुळे यावर्षी बिंदुसरा प्रकल्प भरला होता. तसेच मागील दोन दिवस जिल्ह्यात जोरदार पाऊस झाला असल्याने बिंदुसरा ओव्हरफ्लो होऊन पाणी दोन्ही चादरीवरुन ओसंडून वाहत आहे. यामुळे येथे पर्यटकांची गर्दी वाढली आहे. काल रविवार असल्याने सुट्टीचा दिवस असल्याने मोठी गर्दी झाली होती. अजीजपुरा भागातील एक कुटुंब लेकरं बाळांसह बिंदुसरा प्रकल्पावर आले होते. यावेळी त्यातील १२ वर्षीय मुलगी सेल्फी घेण्याच्या नादात पाय घसरून ती तलावात पडली, मुलगी तलावात पडताच पित्याने उडी घेतली पण त्यांनाही पोहता येत नव्हते, यामुळे बाप, लेक दोघेही गटांगळ्या खात बुडत असल्याने कुटुंबाने आरडाओरडा केली. उपस्थितांनी मदत करण्याऐवजी तेथून पळ काढला, पण हा गोंधळ ऐकून डॉ. मुजाहिद मोमीन यांनी कसलाही विचार न करता तलावात उडी घेतली व बुडत असलेल्या बाप, लेकीला सुरक्षित बाहेर काढले यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. त्यांनी जीवाची बाजी लावत केलेल्या मदतीमुळे कौतुक करण्यात येत आहे. एका कुटुंबाचा आधार वाचवला आहे. यामुळे डॉ. मुजाहिद मोमीन यांच्या धाडसाचे कौतुक करण्यात येत आहे.

## कपिलधारवाडी येथून...

असलेल्या आंदोलनांना गावोगावी मोठा प्रतिसाद मिळत आहे. आंदोलकांच्या जेवणाची सोय करण्यासाठी ग्रामीण भागातील महिला पुढाकार घेत आहेत. या पुढाकारात कपिलधारवाडी ग्रामस्थांनी आंदोलन स्थळी भाकरी, ठेचा, कांदा, भात व पाणी यांची शिदोरी पाठवली आहे. शेतकरी व गृहिणी स्वतः बनवलेले जेवण आंदोलकांपर्यंत पोचवत असून, आंदोलन हे आपल्यासाठीच आहे या भावनेतून ही मदत केली जात आहे. ग्रामीण संस्कृतीचा आणि एकोपा दाखवणारा हा उपक्रम सर्वांच्या कौतुकास्पद ठरत आहे. भाकरी–ठेच्याच्या साध्या पण पौष्टिक शिदोरीमुळे आंदोलकांचा उत्साहही दुणावला आहे. ही शिदोरी फक्त जेवणापुरती मर्यादित नसून, मराठा समाजाच्या ऐक्याचे प्रतीक मानली जात आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

## मराठा हे...

पडली होती. – औरंगाबाद जिल्ह्यात (जालना सह) १९०१ च्या जनगणनेनुसार २,८८,८२५ लोकांची 'मराठा कुणबी' अशी स्पष्ट नोंद असून त्यात पुरुष १,४७,५४२ तर महिला १,४१,२८३ होत्या.

– नांदेड जिल्ह्यात १,२९,७०० मराठा कुणबी नोंद झाली होती, जी त्या वेळी एकूण ३४% लोकसंख्या होती.

– बीड जिल्ह्यात १,९६,००० लोक मराठा कुणबी असल्याचे नमूद केले आहे, म्हणजेच ३९% लोकसंख्या.

– उस्मानाबाद (नळदुर्ग) जिल्ह्यात ३८% लोकसंख्या 'मराठा कुणबी' म्हणून नोंदवली गेली आहे.

– परभणीत २,६०,८०० कुणबी, म्हणजेच ४०% लोकसंख्या, अशी नोंद आहे.

– बिदर जिल्ह्यातही मराठा कुणबी/कापू १,१३,८०० होते; तर त्याच वेळी धनगर ५२ हजार, महार ६८ हजार, आणि मांग–मातंग ६० हजार असल्याचेही स्पष्ट रेकॉर्ड उपलब्ध आहेत.

ब्रिटिश नोंदी कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य– पाटील यांनी यावर भर दिला की, इंडियन एव्हिडन्स क्ट १८७२ नुसार 'इम्पेरियल रेकॉर्ड कीपर'च्या नोंदी कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य मानाव्याच लागतात. या नोंदींवर आधारित पहिल्या नियोजन आयोगाने व शेड्युल्ड कास्ट कमिशननेही निर्णय घेतले होते. जर ब्रिटिशकालीन पूल, तुरुंग, कोषागार किंवा मुद्रा विभागातील नोंदी आज पुरावा म्हणून ग्राह्य धरल्या जातात, तर जातींच्या जनगणनेच्या नोंदी कशा नाकारता येतील? असा प्रश्न पाटील यांनी उपस्थित केला.

शासन आणि आंदोलकांना दाखवला पुरावा– विश्वास पाटील यांनी सांगितले की, त्यांनी स्वतःच्या खर्चाने गेल्या दीड वर्षांत दिल्लीतील संसद लायब्ररी, मुंबई व हैदराबाद अभिलेखागार याठिकाणी अनेक वेळा जाऊन हे रेकॉर्ड तपासले. या आकडेवारीचे त्यांनी आंदोलक आणि शासनाला समक्ष सादरीकरणही केले, मात्र दुर्दैवाने अजूनही ही नोंदी कोणत्याही न्यायालयात सादर झालेल्या नाहीत.

मंडल आयोगाच्या वेळी नोंदींकडे दुर्लक्ष– पाटील म्हणाले की, महाराष्ट्रात मंडल आयोग लागू करताना या आकडेवारीकडे डोळेझाक करण्यात आली. जे लोक १८८१ च्या जनगणनेच्या वेळी गावात होते ते पुढची शंभर वर्षंही तिथेच राहिले आहेत. कुणी हिरोशिमा–नागासाकीप्रमाणे गावं सोडून गेलेली नाहीत. मग या नोंदी आज बोगस म्हणून कशा फेटाळता येतील? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

◆ पान ९ वरून पुढे...

गंभीर विचार करण्याचे आवाहन– शेवटी विश्वास पाटील म्हणाले, ही आकडेवारी फक्त मराठा–कुणबी समाजापुरती मर्यादित नाही, तर ब्राह्मण, जैन, तेली, ख्रिश्चन, चिनी डॉक्टर यांच्यासारख्या सर्व जाती–धर्मांची आहे. भारताचे पहिले नियोजन आयोग, डॉ. आंबेडकर, पंडित नेहरू, पंजाबराव देशमुख यांसारख्या नेत्यांनीसुद्धा याचा आधार घेतला होता. मग आज तीच आकडेवारी 'बोगस' म्हणून नाकारणे योग्य नाही. 'सार्वजनिक सत्यधर्म'कडे पोहोचण्यासाठी ही नोंद गांभीर्याने घ्यायलाच हवी.

## जिल्हा कचेरी...

रुग्णालयातून सांगितले आहे. जोपर्यंत गायनाचा प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत आपले बेमुदत धरणे आंदोलन चालू राहणार आहे. जोपर्यंत गायनाचा प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत आपण या बेमुदत धरने आंदोलनातून माघार घेणार नाहीत अशी स्पष्ट भूमिका त्यांनी उपचारादरम्यान बेडवरून स्पष्ट केली आहे. जीव जरी गेला तरी आता या आंदोलनातून माघार नाही असं त्यांनी सांगितला आहे. या आंदोलनास सर्व स्तरातून मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे.

## आधी संपलेला...

आरोप–प्रत्यारोप सुरू आहेत. तर दुसरीकडे, आरक्षणावरुन खासदार शरद पवार यांच्यावरही टीका सुरू आहेत. यावरून आज सुप्रिया सुळे यांनी प्रत्युत्तर दिले. खासदार सुप्रिया सुळे यांनी आज भाजपावर जोरदार निशाणा साधला. मी काल आंदोलनाला भेट दिली, ती माझी नैतिक जबाबदारी आहे. मी एक लोकप्रतिनिधीं आहे. त्यामुळे सर्वांच्या भावनांचा आदर मी केलाच पाहिजे. एखाद्या मुलाच्या काही वेदना असतील तर त्या ऐकून घेणे, समजून घेणे आणि नुसते समजून घेणे नाही तर त्यातून मार्ग काढणे ही माझी नैतिक जबाबदारी आहे. तिथे फार काही झालेले नाही. एखाद्या मुलाने हट्ट केला तर त्यात गैर काय?, असा सवाल सुळे यांनी केला. महापालिकेने स्वच्छतेवर लक्ष द्यावे काल मी आझाद मैदानावर गेले तेव्हा जरांगे पाटील यांना खूप थकवा आलेला होता. त्यामुळे ते आराम करत होते. आमची थोडक्यात चर्चा झाली. मी फक्त त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. डॉक्टरांशी सविस्तर चर्चा झाली. माझी मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र सरकारला विनंती आहे की त्या परिसरातील स्वच्छतेवर लक्ष द्यावे, असंही सुप्रिया सुळे म्हणाल्या. मागील काही दिवसांपासून महायुतीमधील नेत्यांनी मराठा आरक्षणा संदर्भात खासदार शरद पवार यांच्याकडे बोट दाखवले जात आहे. यावरही आज सुळे यांनी प्रत्युत्तर दिले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# सेवा पंधरवडा : जनतेच्या समस्या सोडवण्याचा लोकाभिमुख उपक्रम

बीड । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या जयंतीनिमित्त दिनांक १७ सप्टेंबर २०२५ ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दिनांक २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राज्यभर सेवा पंधरवडा राबवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे . महसूल व वन विभागाच्या माध्यमातून हा उपक्रम राबवण्यात येणार असून यामध्ये सामान्य जनतेच्या दैनंदिन समस्या , शेतकऱ्यांच्या अडचणी आणि नागरिकांच्या तक्रारी सोडवण्यासाठी विशेष मोहीमा राबवल्या जाणार आहेत .



जनतेच्या हिताचा विचार करणारा शासन निर्णय म्हणजेच लोकाभिमुख प्रशासन . याच धर्तीवर शासनाने तीन टप्प्यांमध्ये हा उपक्रम उभारला आहे . पहिला टप्पा – पाणंद रस्ते विषयक मोहीम – शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत जाणाऱ्या पाणंद रस्त्यांचे संरक्षण , नोंद नसलेल्या रस्त्यांची नोंद घेणे , शेतजमिनीपर्यंत रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी सीमांकन , रस्ता अडथळे दूर करणे अशा कामांवर भर दिला जाणार आहे .

पिके लावूनही जर रस्ता नसेल, तर शेतकरी काय करील ?

धान्य द्यायला रस्ता नसेल, तर भाकर कोण शिजवील ?

या प्रश्नांची उत्तरे शासनाने या मोहिमेतून शोधण्याचा प्रयत्न केला आहे . दुसरा टप्पा – सर्वांसाठी घरे व पात्रांना पट्टे वाटप : दिनांक २३ सप्टेंबर ते २७ सप्टेंबरदरम्यान या टप्प्यात ' सर्वांसाठी घरे ' या योजनेअंतर्गत राहिवाशांना शासकीय जमिनीवरील नियमित हक्क देणे , झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन , शेतकऱ्यांना पट्टे वाटप , तसेच गरजूंना कायमस्वरूपी मालकीचा अधिकार देण्याचे काम केले जाणार आहे .

घर हेच सुखाचं मूळ, घराशिवाय संसार कसा फुल ?

शेतकऱ्याला जमीन, नागरिकाला घर, यातूनच दिसेल समृद्धीचा दरबार !

तिसरा टप्पा – नावीण्यपूर्ण उपक्रम – दिनांक २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान जिल्हाधिकारी स्थानिक समस्यांवर उपाययोजना राबवतील . पाणी , जमीन , आरोग्य , शिक्षण यासंबंधी जिल्ह्यातील स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासन पुढाकार घेईल . यातूनच शासनाचा लोकाभिमुखताचा चेहरा अधिक स्पष्ट होईल .

हा निर्णय शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे . कारण पाणंद रस्त्यांची समस्या वर्षानुवर्षे शेतकरी अनुभवत आहेत . शेतमाल बाजारात पोचवण्यासाठी रस्त्यांची सुविधा हा शेतकऱ्यांचा मुलभूत अधिकार आहे . घर आणि जमिनीवरील हक्क ही तर प्रत्येक नागरिकाची गरज आहे . शासनाने या उपक्रमातून त्या समस्या दूर करण्याचे वचन दिले आहे .

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे – सोनवणे, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, अधीक्षक भूमी अभिलेख तसेच उपअधीक्षक भूमी अभिलेख यांच्या प्रयत्नातून नागरिकांच्या तक्रारी व अडचणी तातडीने सोडवण्याचे काम सुरू आहे . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनीही पुढाकार घेऊन वादग्रस्त रस्ते मोकळे करणे , सस्ती अदालतांचे आयोजन करणे आणि नागरिकांना प्रत्यक्ष न्याय देणे अशा अनेक उपक्रमांत सक्रिय सहभाग नोंदवला आहे .



मागील शासन निर्णयांचा संदर्भ घेतल्यास , ग्राम विकास विभागाचा दिनांक १६.०२.२०१८ चा निर्णय , नगरविकास विभागाचा दिनांक ११.०९.२०१८ चा निर्णय , तसेच महसूल विभागाचे १९९६ पासूनचे विविध निर्णय हे सर्व या उपक्रमाशी जोडले गेले आहेत . म्हणजेच, हा उपक्रम केवळ औपचारिक नसून, आधीच्या निर्णयांना नवा गतीमान वेग देणारा आहे .

रस्ता मिळाला, तर पिके बाजारात पोहोचतील , घर मिळालं, तर संसार उजळून निघेल ,

हक्क मिळाला, तर न्याय अनुभवता येईल , सेवा पंधरवडा जनतेचा दीप उजळवेल !

या उपक्रमात स्थानिक लोकप्रतिनिधी, पंचायत समिती , ग्रामपंचायत सदस्य , शेतकरी , नागरिक सर्वांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे . म्हणूनच सेवा पंधरवडा हा केवळ उपक्रम नाही , तर तो जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी शासनाचा संकल्प आहे . छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या माध्यमातून सुरू झालेला हा लोकाभिमुख प्रवास राज्यातील शेतकरी व नागरिकांसाठी नवा आशेचा किरण ठरेल यात शंका नाही .

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुणे मेट्रोच्या पादचारी पुलाचे उद्घाटन

पुणे । प्रतिनिधी

पुणे मेट्रोच्या छत्रपती संभाजी उद्यान मेट्रो स्थानक ते शनिवार पेठ यांना जोडणाऱ्या पादचारी पुलाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या पादचारी पुलाची रचना अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आणि आदर्श असून हा स्थापत्यकलेचा उत्तम नमुना आहे. पुलामुळे पेठेतील नागरिकांना मेट्रोने प्रवास करण्याची चांगली सुविधा निर्माण झाली आहे, असे यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. यावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार हेमंत रासने, सुनील कांबळे, सिद्धार्थ शिरोळे, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आदी उपस्थित होते. पुणे मेट्रोच्या टप्पा १ अंतर्गत वनाझ स्थानक ते रामवाडी या मार्गादरम्यान डेक्कन जिमखाना आणि छत्रपती संभाजी उद्यानाला पेठ भागाशी जोडण्यासाठी दोन पुलांचे नियोजन करण्यात आले होते. यापैकी छत्रपती संभाजी उद्यान ते शनिवार पेठ या पादचारी पुलाचे काम पूर्ण झाले आहे. या पुलामुळे मुठा नदीच्या पलिकडे शनिवार पेठ, नारायण पेठ आणि परिसरातील नागरिकांना छत्रपती संभाजी उद्यान मेट्रो स्थानकात येणे सुलभ होणार आहे.



भारतातील पहिला ७० डिग्री कललेला काँक्रीटचा पायलन या पुलामध्ये आहे. उच्च तणावक्षमता असलेल्या २० केबल्स पुलाचा भार उचलण्यासाठी बसविण्यात आला आहे. पुलाची एकूण लांबी १७९. ७९१ मीटर तर रुंदी ८ मीटर आहे. या पुलाची रचना अत्याधुनिक 'केबल स्टेड ब्रिज' या तंत्रज्ञानाचा वापर करून करण्यात आली आहे.

या पुलासाठी नदीपात्रात केवळ दोन खांब उभारण्यात आल्याने नदीच्या प्रवाहाला अडथळा होणार नाही. पादचारी पुलाजवळ बालगंधर्व रंगमंदिर असल्याने पुण्याच्या सांस्कृतिक वारशाला अनुसरून पुलाची रचना तानपुऱ्यासारखी करण्यात आली आहे. पुलामध्ये अभियांत्रिकी आणि कलेचा उत्तम संगम साधण्यात आला आहे.

# गणेशोत्सवानिमित्त राज्याबाहेर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**डेहराडून, बडोदा, दिल्ली, बेळगाव, गोवा येथे सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून गणेशोत्सव**

मुंबई । प्रतिनिधी

गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आला असून यानिमित्ताने सांस्कृतिक कार्य विभागातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्याबाहेर मराठीबहुल असणाऱ्या प्रदेशात पाच ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून गणेशोत्सव साजरा केला जाणार आहे.



या कार्यक्रमाची संकल्पना सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांची असून या कार्यक्रमाकरिता सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

गणेशोत्सवानिमित्त कलाकारांना महाराष्ट्र राज्याबाहेर देखील व्यासपीठ मिळणार आहे. याचाच एक भाग म्हणून २७ ते २९ ऑगस्ट, २०२५ दरम्यान वन संशोधन केंद्र डेहराडून या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले. उर्वरित कार्यक्रम ०१ सप्टेंबर २०२५ रोजी नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे तर ३ सप्टेंबर २०२५ रोजी के एम गिरी सभागृह, बेळगाव या सीमावर्ती भागात गणेशोत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले आहे. सर सयाजीराव नगर वडोदरा गुजरात या ठिकाणी ४ सप्टेंबर २०२५ रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन होणार आहे. तसेच ५ सप्टेंबर २०२५ रोजी गोवा या राज्यात मराठी बांधवांसाठी भव्य अशा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

रसिक प्रेक्षकांनी या सर्व कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.

# रायगडात रिक्षाचा मोठा अपघात, शाखा प्रमुखासह तिघांचा मृत्यू



रायगड । प्रतिनिधी

रायगडातील म्हसळा तालुक्यातील खामगावनजीक रिक्षाचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात चालकासहीत दोन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला आहे. या अपघातात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कणघरचे शाखा प्रमुख संतोष सावंत यांचाही मृत्यू झाला आहे. संतोष सावंत हे आपल रिक्षा घेऊन गोरेगाव दिशेकडे जात असताना म्हसळा गोरेगाव मार्गावरील ताम्हाणे शिर्के ते कासार मलाई दरम्यान त्यांच्या वाहनाचे ब्रेक फेल झाला आणि त्यांचे वाहन रस्त्यांच्याकडेला आदळले.

म्हसळा तालुक्यातील खामगावनजीक शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कणघरचे शाखा प्रमुख संतोष सावंत हे रिक्षा चालवत असताना त्यांच्या रिक्षाचे ब्रेक फेल झाल्याने त्यांचे नियंत्रण सुटून ही रिक्षा रस्त्याच्याकडेला आदळली. गोरेगाव दिशेकडे जात असताना म्हसळा गोरेगाव मार्गावरील ताम्हाणे शिर्के ते कासार मलाई दरम्यान त्यांच्या वाहन रस्त्याच्या कडेला आदळले.या अपघातामध्ये शाखाप्रमुख संतोष सावंत यांचा जागीच मृत्यू झाला तर वाहनातील प्रवासी शांताराम काळीदास धोकटे आणि शर्मिलाबाई तुकाराम धोकटे यांचा माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचे उघडकीस आले आहे. या अपघातात रिक्षा चालक असलेले संतोष सावंत हे शाखाप्रमुख होते. त्यांचा या अपघातात जागीच मृत्यू झाला आहे. शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे संतोष सावंत शाखा प्रमुख होते. या अपघातात रिक्षातील प्रवासी शांताराम काळीदास धोकटे आणि शर्मिलाबाई तुकाराम धोकटे हे गंभीररित्या जखमी झाले होते. यांना जखमी अवस्थेत माणगाव येथील उप जिल्हा रुग्णालयात दाखल केले होते. तेथे त्यांना डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले.तिघांच्या मृत्यूने या परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# गॅसचा नॉब सुरुच राहिला अन्... लहानशा चुकीनं घेतला बहीण-भावाचा जीव, तर ३ जण रुग्णालयात

सोलापुर । प्रतिनिधी

सोलापुरात एका कुटुंबात धक्कादायक घटना घडली आहे. दहा बाय पाचच्या हवा बंद खोलीत पाच जणांच्या संसारावर भयानक प्रकार घडला. दोन चिमुकले, आई – वडील आणि आजी रात्री झोपले आणि सकाळी बेशुद्धावस्थेत सापडले. या घटनेत सहा वर्षांचा मुलगा हर्ष आणि चार वर्षांची मुलगी अक्षरा यांचा मृत्यू झाला आहे. तर सासू सूनेवर रुग्णालयात उपचार सुरु असून त्या दोघी गंभीर अवस्थेत आहेत. तर नवऱ्यावर उपचार सुरु आहे. रात्री एका चुकीमुळे पाच जणांसोबत भयंकर प्रकार घडला आहे. ही घटना सोलापुरातील लष्कर भागात सकाळी ११ च्या सुमारास समोर आली. हे कुटुंब शनिवारी रात्री जेवण करून आपल्या घरात झोपलं असताना मध्यरात्री खोलीत झालेल्या गॅस गळतीमुळे हा प्रकार घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोलापूर शहरातील लष्कर परिसरातील बेडरफुलजवळ युवराज मोहन सिंग बलरामवाले (वय ४०) यांचं कुटुंब वास्तव करत होते. त्यांच्या कुटुंबात पत्नी रंजना (वय ३५), आई विमल (वय ६०), मुलगा हर्ष (वय ६) आणि मुलगी अक्षरा (वय ४) अशा पाच जण होते. युवराज बलरामवाले हे गोवंडी म्हणून काम करायचे आणि पत्नी रंजना विडी कामगार आहेत. बेडरफुलजवळ त्यांचं दहा बाय पाचचं छोटंसं घरात एका चुकीमुळे कुटुंबावर मोठं संकट कोसळलं.



घटनेच्या दिवशी शनिवारी रात्री हे कुटुंब रात्री जेवण घरून हवा बंद खोलीत झोपलं असताना रात्री झोपताना गॅस व्यवस्थित बंद न केल्यामुळे दहा बाय पाचच्या हवा बंद खोलीत वायू गळती झाली. ज्यामुळे संपूर्ण कुटुंब बेशुद्ध झाले. रंजना यांच्यासोबत काम करणाऱ्या महिला विडीचे पत्ते घेण्यासाठी त्यांच्या घरी गेल्या असताना ही घटना समोर आली आहे. त्यांना हे कुटुंब बेशुद्ध अवस्थेत आढळले. यानंतर त्यांनी तत्काळ शेजाऱ्यांना आणि नातेवाईकांना माहिती दिली. त्यानंतर त्यांना सर्वांना सिव्हिल रुग्णालयात दाखल केलं आहे. मात्र, उपचारादरम्यान हर्ष आणि अक्षरा यांचा दुर्दैवी मृत्यू मृत्यूने खळबळ माजले आहेत.

# नाशिक हादरलं! पहिल्या पत्नीसोबत जास्त वेळ घालवल्यामुळे दुसऱ्या पत्नीने...

नाशिक । प्रतिनिधी

जिल्ह्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. येथ राहणाऱ्या एका पत्नीने आपल्या पतीला मृत्यूच्या दारात पाठवले. त्या व्यक्तीने दोन लग्ने केली होती, पण तो आपल्या पहिल्या पत्नीला जास्त वेळ देत होता आणि दुसऱ्या पत्नीसोबत कमी वेळ घालवत होता.

त्यामुळे दुसऱ्या पत्नीने आपल्या पतीला मारले. ही घटना आडगांव–सैयद पिंपरी रोड येथे घडली. ही घटना शुक्रवारी रात्री घडली. पिंपरी रोडवरील एका वस्तीत दुसऱ्या पत्नीने आधी आपल्या दोन भावांसह मिळून पतीला बेदम मारहाण केली. त्यानंतर धारदार शस्त्राने वार करत पतीची हत्या केली. खरे तर, भावसार मूलचंद पवार उर्फ बाला हा खेळणी विकण्याचे काम करत होता. त्याने दोन लग्ने केली होती, पण तो आपल्या पहिल्या पत्नीला जास्त वेळ देत होता आणि तिच्यासोबत जास्त काळ राहत होता. दुसऱ्या पत्नीला कमी वेळ देत होता. याच रागातून दुसऱ्या पत्नीने भावसारची हत्या केली. या प्रकरणात पत्नी सुनीता, तिचा भाऊ राज शिंदे, आदित्य शिंदे यांच्यासह दीपक आणि आणखी एका आरोपींची नावे समोर आली आहेत. भावसार मूलचंद पवार उर्फ बालाची दुसरी पत्नी सुनीता यांचा पती बराच काळ आपल्या पहिल्या पत्नीसोबत राहत होता. त्यामुळे तिने आपल्या दोन भावांच्या मदतीने पतीला बेदम मारहाण केली आणि त्यानंतर धारदार शस्त्राने त्याची हत्या केली. भावसारच्या पहिल्या पत्नी निरमा पवार यांनी यासंदर्भात तक्रार दाखल केली आहे.

# कोकणातील अनोखे मंदिर ! येथे गणेश चतुर्थीला नव्हे तर दिवाळीत होते बाप्पाची स्थापना



प्रतिनिधी

राज्यातील पाच दिवसांच्या बाप्पाचे ३१ ऑगस्ट रोजी थाटामाटात विसर्जन पार पडले. तर काही ठिकाणी बाप्पाचे २ सप्टेंबर रोजी विसर्जन होणार. बाप्पाला निरोप देण्यासाठी दोन दिवस राहिले आहेत तरीही गणेशभक्तांचा उत्साह कायम आहे. कोकणात गणेशोत्सवाचा थाट काही निराळाच असतो. कोकणवासिय हमखास गणपतीला गावी जातोच. मात्र कोकणात असं एक मंदिर आहे जिथे गणेशोत्सवात नव्हे तर दिवाळीला गणेशाची प्राणप्रतिष्ठा केली जाते.

कोकणातील या गावात लक्ष्मी पूजनाच्या दिवशी बाप्पाची स्थापना केली जाते. वेंगुर्ला गावातील उभादांडा या गावात हे अनोखे गणेश मंदिर आहे. निसर्ग सौंदर्याने नटलेल्या या गावात वेंगुर्ला–शिरोडा मार्गावर रस्त्याच्या शेजारीच उभादांडा हे मंदिर आहे. हे मंदिर साधारणपणे २५०–३०० वर्ष जुने आहे. या मंदिराला दरवाजेदेखील नाहीत. विशेष म्हणजे २४ तास हे मंदिर खुले असते. या मंदिरातही कोकणातील घरात जशी गणेशोत्सवासाठी पारंपारिक आरास केली जाते तशीच येथेही पारंपारिक पद्धतीने गणेशाची प्राणप्रतिष्ठा केली जाते. गणेशाची मूर्तीदेखील शाडूच्या मातीची असते. गावातीलच चित्रशाळेतून वाजतगाजत गणेश मूर्ती आणून तिची मंदिरात प्रतिष्ठापना केली जाते. विशेष म्हणजे लक्ष्मीपूजनाच्या दिवशी बाप्पा बसवला जातो तो ५ किंवा २१ दिवसांनी नाही तर थेट शिमग्याला विसर्जन केले जाते. त्यानंतर पुढच्या दिवाळीपर्यंत मंदिरात बाप्पाच्या फोटोची पूजा केली जाते. उभादांड्याचा हा गणपती म्हणजे गजांतलक्ष्मीचे स्वरूप आहे. ४ ते ५ महिने या ठिकाणी नवस बोलणे, नवस फेडणे, भजने, कीर्तन, जत्रोत्सव इत्यादी कार्यक्रम झाल्यावर म्हामणे करून होळी पौर्णिमेच्या पूर्वी श्री देव वाघेश्वर कडून श्री सागरेश्वर किनारी महाआरती करून विसर्जन केले जाते.

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • मंगळवार, दि. ०२ सप्टेंबर २०२५ • पान ४

## थोडक्यात...

### आल्या आल्या गौरी... सोन्यांच्या पावली!



**बीड । प्रतिनिधी**

गौरी आली सोन्याच्या पावली... गौरी आली रूप्याच्या पावली... हळदी कुंकवाचे लेणं घेऊन गौरी आली... गौरी आली असे म्हणत गौरीचे आंदर गेवराई शहरात उत्साहात स्वागत करण्यात आले. सुवासिनीने गौराईचे मोठ्या श्रद्धेने आणि भक्तीभावाने पारंपारिक पद्धतीने माहेरवाशीण गौरीची विधिवत पूजा केली. माहेरवाशीण बनून आलेल्या गौरीला पहिल्या दिवशी भाजी भाकरीचा नैवेद्य दाखवून दिला खाऊ घातले. गणरायाच्या शेजारी थाटामाटात गौरीला विसावून, तिला भरजरी वस्त्र आणि अलंकाराने नटविले. रानातील लालफुले आणि लव्हाचे पात ठेवून तिला मान दिला. घराघरातील माजघरात लाडक्या माहेरवाशिणींसाठी गोडधोड सणाचा बेतही सुरू होता. घागर घुमूंदे घुमूदे, रामा, पावा वाजू दे... आला शंकरुबा शंकरुबा, गवर माझी लाजू दे... या सारखी पारंपारिक गीते गाऊन महिला मंडळींनी गौरीचा सण साजरा केला. गाव खेड्यातील महिलांनी गौरी पारंपारिक गाण्यांना उजळा दिला.

### विजयकुमार कटारे सेट परीक्षा उत्तीर्ण



**माजलगाव। प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील जि. प. प्राथमिक शाळा पुनंदगाव येथे. कार्यरत शिक्षक विजयकुमार गुलाबराव कटारे हे शिक्षणशास्त्र विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. विजयकुमार कटारे हे म ूळचे वाघोरा गावचे आहेत. त्यांनी अत्यंत कष्टाने आपले शिक्षण पूर्ण केले आहे. मागीलअठरा वर्षापासून ते जिल्हा परिषद शाळेत शिक्षक आहेत. एक हाडाचा शिक्षक म्हणून त्यांची परिसरामध्ये ओळख आहे. त्यांच्या या यशाबद्दल माजलगावचे गट साधन गटशिक्षणाधिकारी श्री महामुनी साहेब, केंद्रप्रमुख श्री झोंबाडे केंद्रीय मुख्याध्यापक श्री काळे शाळेचे मुख्याध्यापक श्री गणगे , सर्व सहशिक्षक ,मित्रपरिवार, कुटुंब व नातेवाईक यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### कोंडीबा जगताप यांचे दुःखद निधन



**माजलगाव। प्रतिनिधी**

माजी आमदार बाजीराव जगताप यांचे लहान बंधू कोंडीबा सोनाजीराव जगताप वय ६७ वर्षे यांचे अल्पशा आजाराने दि.३१रविवार रोजी दुपारी ४.३० वाजण्याच्या सुमारास दुःखद निधन झाले आहे. अत्यंत शांत,संयमी,प्रेमळ असलेले कोंडीबा सोनाजीराव जगताप,यांचे अल्पशा आजाराने दि.३१ऑगस्ट रोजी दुपारी ४.३० वाजण्याच्या सुमारास दुःखद निधन झाले आहे.त्यांच्या पार्थ देहावर रात्री दहा वाजता मंगलनाथ स्मशानभूमी मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन भाऊ,पत्नी दोन मुले,पाच मुली,सुना-नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### श्रीकृष्ण कानिटकर यांचे निधन



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जेष्ठ नागरिक व माजी ग्राम पंचायत सदस्य,शेतीनिष्ठ शेतकरी श्रीकृष्ण मोरेश्वरराव कानिटकर वय ७७ यांचे रविवारी दुपारी ३.२० वाजता संभाजीनगर येथील खाजगी रूग्णालयात उपचारा दरम्यान निधन झाले. कृष्णा बाबा या नावाने गावात परिचीत असलेले कानिटकर यांचा धार्मिक, सामाजीक कार्यात मोठा सहभाग होता. गावात पाणीटंचाई असतांना त्यांनी स्वत:च्या शेतातील पीकाची पर्वा न करता गावातील लोकांना मोफत पाणी देवुन त्यांची तहान भागवली. येथील ग्रामपंचायतीवर अनेकवेळा ते सदस्य म्हणून निवडून गेले होते. वृध्दापकाळाने मागील सहा दिवसांपासून संभाजीनगर येथील खाजगी रूग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात येत होते. उपचार सुरू असतांना रविवारी दुपारी त्यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थीवावर रविवारी रात्री साडेआठ वाजता वाजता गावातील भालचंद्र मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याजवळील स्मशानभुमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात दोन विवाहित मुली, जावई ,एक मुलगा असा परिवार आहे.

### अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे कामगार त्रस्त!

**बीड । प्रतिनिधी**

कामगार अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे कामगारांना त्रस्त व्हावे लागते, कारण त्यांचे काम व्यवस्थित न झाल्यामुळे किंवा त्यांच्या मागण्या पूर्ण न झाल्यामुळे कामगार अडचणीत येतात. अनेकदा हलगर्जीपणामुळे कामगारांना नोंदणीकृत न झाल्याने येजनेचा फ़ायदा मिळत नसल्याने जिल्ह्यातील कामगार त्रस्त झाल्याचे महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नगरसेवक अमर शेख यांनी म्हटले या बाबत पुढे बोलताना नगरसेवक अमर शेख यांनी म्हटले बीड जिल्हा सरकारी कामगार अधिकारी हे नवीनच पदभार घेऊन रुजू झालेले असून ते त्यांच्या कार्यालयात बसत नाही अनेक कामगारांचे प्रकरण व्यवस्थित पाहून मंजूर करत नाही जिल्ह्यातील कामगारांचे अनेक प्रकरण पेंडिंग असल्याने जिल्ह्यातील कामगार त्ररस्त आहे नवीन रुजू झालेले जिल्हा कामगार अधिकारी यांना आता रुजू होऊन सुद्धा २ महिनेच्या वर होऊन सुद्धा जिल्ह्यातील कामगारांचे अनेक प्रकरणे विनाकारण पेंडीग केले.

# माजलगाव धरणातून 9 गेटद्वारे 13 हजार क्युसेसने पाण्याचा विसर्ग

**माजलगाव । प्रतिनिधी**



मागील काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील सर्व लहान-मोठे तलाव तुडुंब भरली असून,त्यातील पाण्याचा प्रवाह माजलगाव धरणात वेगाने येत असल्याने माजलगाव धरण तुडुंब भरले आहे. त्यामुळे धरणाचे टप्प्या टप्प्याने ९ दरवाजे उघडले असून,या दरवाजातून १८ हजार क्युसेसने सिंदफणा नदीपात्रात पाणी सोडण्यात आले आहे.तर तालुक्यातील २५ हजार हेक्टर जमिनीचे अतिवृष्टीने नुकसान झाले असून,त्याची पाहणी करण्यासाठी तहसीलदार संतोष रुईकर व तालुका कृषी अधिकारी हे शेत बांधावर फिरून पाहणी करत आहेत. माजलगाव धरण कार्यक्षेत्रातील सिंदफणा नदीसह कुंडलिका नदी,तसेच बिंदुसरा ही धरणे तुडुंब भरली आहेत. त्यातील पाण्याचा प्रवाह २५ हजार क्युसेसने माजलगाव धरणात आवक येत आहे.त्यामुळे महसूल व पाटबंधारे प्रशासनाने सिंदफणा नदीपात्रात पाणी सोडण्याचा निर्णय घेतला, माजलगाव धरणाचे दरवाजे अर्धा मीटरने उचलण्यात आले असून,त्याद्वारे १३९९० क्युसेसने पाणी नदीपात्रात सोडण्यात आले आहे. रात्री दहा वाजता तीन दरवाजे उघडले ▶ उर्वरित पान २ वर

## लिंबागणेश येथे रास्ता रोको

### मनोजदादा जरांगे पाटलांच्या उपोषणाला पाठिंबा आंदोलनाची धग वाढली: डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**



सरकार मराठा आरक्षणाच्या मागण्या पूर्ण करत नसल्याने मनोजदादा जरांगे पाटलांनी आजपासून पाणी त्याग करून कडक उपोषणाला सुरुवात केली. त्यामुळे आंदोलनाची धग अधिक वाढली आहे. त्याच धर्तीवर बीड तालुक्यातील अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग (क्र. ५४८ डी) वरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान, लिंबागणेश येथे मराठा सेवक डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१ सोम वार रोजी सकाळी रास्तारोको आंदोलन करण्यात आले. बहुजन समाजातील बांधवांनी जरांगे पाटलांच्या उपोषणाला जाहीर पाठिंबा दर्शविला व मागण्या तातडीने मान्य करण्याची मागणी केली. निवेदन नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक पद्माकर आहेर, सपो.लक्ष्मण बीडकर, बाबासाहेब राख, गोविंद बडे पोह. प्रशांत क्षीरसागर, सतिश राऊत, अविनाश घुंगरट, विशाल क्षीरसागर, बाळासाहेब ढाकणे, विशाल कदम,महसूल प्रशासनाचे मंडळ ▶ उर्वरित पान २ वर

## हुतात्मा स्मारकाची होणार स्वच्छता आणि रंगरंगोटी : मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या कार्यक्रमासाठी प्रशासन सज्ज



**बीड । प्रतिनिधी**

आगामी १७ सप्टेंबर रोजी बीड शहरातील हुतात्मा स्म ारकावर आयोजित कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर सोमवार दिनांक १ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या सूचनेनुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्मारकाची पाहणी केली . जिल्हा परिषद मुख्य ▶ उर्वरित पान २ वर

## परळी रेल्वे स्थानकावर सहा वर्षीय बालिकेवर अत्याचार

### नराधम आरोपी पाच तासात पोलिसांच्या ताब्यात

**परळी । प्रतिनिधी**



परळी रेल्वे स्थानकावर सहा वर्षीय बालिकेवर अज्ञात नराधमाने अमानुष अत्याचार केल्याची संतापजनक घटना रविवारी दुपारी उघडकीस आली. या घटनेने संपूर्ण शहर हादरले असून नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे पण पोलीस यंत्रणेमुळे अवघ्या पाच तासात आरोपीला अटक करण्यात आली आहे. पंढरपूर येथील एक दांपत्य आपल्या पाच वर्षीय मुलीसह रोजगाराच्या शोधात परळी येथे रविवारी (३१ ऑगस्ट) आले होते. दुपारी १२ वाजताच्या सुमारास रेल्वे स्थानकावर उतरल्यावर आजारी असलेल्या मुलीच्या आईने स्थानकावरच थोडा वेळ ▶ उर्वरित पान २ वर

## गणेशोत्सव निमित्त लिंबागणेश येथे पोलिसांचे पथसंचलन

**लिंबागणेश । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील सुप्रसिद्ध श्रीक्षेत्र भालचंद्र गणपतीच्या पावनभूमीत मयुरेश्वर गणरायाची प्रतिष्ठापना सरकार वाड्यात मोठ्या श्रद्धा-उत्साहात करण्यात आली.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कांवत व सहाय्यक पोलीस अधीक्षक (उपविभाग केज) ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, नेकनुर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांच्या नेतृत्वाखाली आज (दि.१) सोम वार रोजी सायंकाळी लिंबागणेश येथे पथसंचलन पार पडले.

पथसंचलनास सुरुवात पोलीस चौकी येथून होऊन फबस स्थानक फ हनुमान चौक फ वाणी चौक फ ढवळे चौक फसरकार वाडा असा म ार्गक्रमण करत पुन्हा पोलीस चौकी येथे सांगता झाली.

▶ उर्वरित पान २ वर

## चौकात वाढदिवसाचा गोंगाट बंद करा, अन्यथा थेट कारवाई : पोलिसांचा इशारा

### हॉलमध्ये साजरा करा वाढदिवस, चौकात नाही: पोलीस निरीक्षक बल्लाळ यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**



शहरातील काही ठिकाणी रात्री चौकात मोठ्या आवाजात फटाके फोडून व गर्दी करून वाढदिवस साजरे करत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा भंग होत असून वाहतुकीतही अडथळा निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ यांनी कठोर इशारा दिला आहे. मध्यरात्री वाढदिवस साजरे करताना मोठ्या प्रमाणावर फटाके वाजवले जातात. दहा ते पंधरा मिनिटे सुरू राहणाऱ्या या गोंगाटामुळे जवळपास राहणाऱ्या नागरिकांच्या झोपेचा व आरोग्याचा प्रश्न गंभीर बनतो. पोलिसांकडे फोटो द्या, त्वरित कारवाई होणार- अशा प्रकारच्या प्रकारांचा बळी ठरलेल्या नागरिकांनी पोलिसांना मदत करावी, असे आवाहनही पोलीस निरीक्षक बल्लाळ यांनी केले. नाईट पेट्रोलिंगची गाडी त्वरित घटनास्थळी पोहोचावी यासाठी ▶ उर्वरित पान २ वर



*मुख्यमंत्री निवासस्थानी 'वर्षा' येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सत्कार करताना सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे, आ. प्रसाद लाड आदी.*

## येवलवाडी येथे जय भगवान गणेश मंडळाचा अभिनव उपक्रम

### गणेशोत्सवात रक्तदान, डोळे तपासणी व रांगोळी स्पर्धेचे आयोजन

**पाटोदा । प्रतिनिधी**



पाटोदा तालुक्यातील नागरगोजे (येवलवाडी) येथे यंदाचा गणेशोत्सव केवळ उत्सवपुरता मर्यादित न ठेवता सामाजिक बांधिलकीची जाणीव जपणारा ठरला आहे. येथील जय भगवान गणेश मंडळाने प्रथमच विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करून ग्राम स्थांचे लक्ष वेधून घेतले व मन जिकंले गणेशोत्सवाच्या पार्श्वभूम ीवर आयोजित रक्तदान शिबिरामध्ये गावातील तसेच परिसरातील युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. समाजासाठी थेट उपयोगी ठरणाऱ्या या कार्यात तरुणाईने उत्साहाने रक्तदान करून आपले योगदान नोंदवले.

ग्रामस्थांच्या आरोग्याच्या दृष्टीने डोळे तपासणी शिबिर घेण्यात आले. शेकडो नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. अनेक ज्येष्ठ नागरिक व महिलांनी आपल्या आरोग्याविषयी जागरूकता वाढवण्याची संधी साधली.तसेच गावातील महिला व विद्यार्थिनींसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. रंगांच्या उधळणीने गावाचे वातावरण अधिकच आनंदमय झाले. सहभागी महिलांनी विविध ▶ उर्वरित पान २ वर